**नि.क्र. २६९**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ चा जबाब</u>**

साक्षीदाराचे नावः– **अशोक नागोराव मोरे,**

वयः– ६५ वर्षे, व्यवसायः– **शेती,**

राहणारः– **झरी, ता. निलंगा जि. लातूर.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकरी विधीज्ञ श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचेमार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**०१.** मी सन २००७ मध्ये जलस्वराज्य प्रकल्प समिती झरी मध्ये सदसय होतो. त्या समितीचे अध्यक्ष दिनकर व्यंकटराव पाटील हे होते. चंद्रकला प्रभाकर शिंदे हया सचीव होत्या. झरी गावामध्ये जलस्वराज्य स्कीम आली होती. त्या स्कीम मध्ये त्या समितीदुवारे पाण्याच्या टाकीचे बांधकाम, पाईपलाईन, विहीर खोदकाम, इत्यादी कामे होती. पाण्याच्या टाकीचे बांधकाम विठठलराव जाधव आणि माधव खोत यांच्या कडे दिले होते. विहीरोच खोदकाम सत्यनारायण विठठराव माने यांच्या कडे दिले होते. मारोती पाटील यांना पाईपलाईन चे काम दिले होते. आणि प्रभाकर शिंदे यांना मोटार खरेदीचे काम दिले होते. अध्यक्ष आणि सचिव यांच्या नावे बँकेमध्ये संयुक्त खाते होते. ते काम ठराव घेवून दिले होते. अध्यक्ष आणि सचिव यांना बॅकेतून धनादेशादवारे रक्कम दिली होती. ते काम आरोपींनी अर्धवट केले. आरोपींना मी ओळखतो. आरोपी क्र ३ व ५ न्यायालयात हजर आहेत. आरोपी क्र १ व २ गैरहजर आहेत.

**<u>उलटतपास आरोपी क्र १ ते ३ व ५ तर्फे अॅड.जी. जी. हाडोळे यांच्या मार्फत शपथेवर सुरू –</u>**

२. आरोपींना किती रुपये दिले होते हे मला माहित नव्हते.

माझ्या समक्ष आरोपीना धनादेश दिले नव्हते. त्या कामाची साधनसामग्री किती रक्कम देवून खरेदी केली हे मी पाहिले नाही. आरोपींनी त्यांना दिलेले काम किती केले हे मी पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिनकर पाटील यांच्या राजकीय गटातील असल्याने आरोपींच्या विरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.04.09 17:25:01 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक ०९/०४/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा